SHREEMATI NATHI BAI DAMODAR THACKERSEY
# WOMEN'S UNIVERSITY
Pariksha Bhavan, Sir Vithaldas Thackersey Vidyavihar,
Juhu Road, Santacruz (west), Mumbai - 400 049.
www.sndt.ac.in, E-mail : doee@sndt.ac.in,drexam@sndt.ac.in
E-mail : drexam1@sndt.ac.in, arexam@sndt.ac.in

DOEE (D) : 2661 5159
Dy. Registrar : 2661 1524
Dy. Registrar 1 : 2660 3259
Asst. Registrar : 2661 5138
B.Ed, H.Sc, Nsg. DMLT : 2660 3322
B.A. B.Com., M.A., M.Com., Law : 2661 1595
Accounts : 2660 8374
Degree, Migm, Certi. : 2661 2877
M.Phil. Ph.D : 2660 3259
Confidential : 2661 2265
Tech., Pharma., BCA,BMS : 2661 5985
CFC : 2660 8304 / 2661 5168

संदर्भ क्र.:परीक्षा/दिव्यांग/ऑनलाईन परीक्षा/सोयी/२०२०-२१/१२ दिनांक-१८ सप्टेंबर, २०२०

प्रति,

१. मा. विभाग प्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक विभाग, चर्चगेट, जुहू व पुणे आवार,

२. मा. प्राचार्या, संचलित व संलग्नित महाविद्यालये.

**विषय: कोविड-१९ साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर अंतिम सत्र व इतर सत्र / वर्ष ( विद्यापीठीय मुल्यांकन असलेले) (व्यवसायीक /अव्यवसायीक ) परीक्षा देणाऱ्या दिव्यांग विद्यार्थिनींना सोयी सुविधा पुरविण्याबाबत –**

संदर्भ: १. शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/वि.शि.-३, दि.०४ मार्च, २०१७,

२. मा.संचालक, उच्च व शिक्षण, म.रा. पत्र.क्र.यु.एन.आय/२०२०/

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासनाने सर्व अकृषी विद्यापीठाच्या कुलगुरुंच्या आभासी बैठकीत, कोविड-१९ साथरोगाच्या पार्श्वभूमीवर घेण्यात येत असलेल्या अंतिम वर्ष / अंतिम वर्ष व इतर वर्ष / संत्राच्या नवीन व पुनरपरीक्षांसाठी दिव्यांग विद्यार्थिनींच्या आरोग्याचे हित विचारात घेऊन आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविण्यात येणे विषयी खालीलप्रमाणे सूचना करण्यात आलेल्या आहेत.

१. महाराष्ट्र शासन निणर्य क्र. संकीर्ण-२०१६/प्र.क्र.३०२/वि.शि.-३, दि.०४ मार्च, २०१७ मध्ये नमूद केलेल्या सूचना व त्याप्रमाणे सर्व दिव्यांग विद्यार्थिनींना आवश्यकतेप्रमाणे सोयी सुविधा पुरविण्यात याव्यात (प्रत सोबत जोडली आहे).

२. ज्या दिव्यांग विद्यार्थिनींना ऑनलाईन पद्धतीने घरुन किंवा इतर ठिकाणाहून परीक्षा देणे शक्य नसेल, अशा विद्यार्थिनींसाठी संबंधीत महाविद्यालयात / विद्यापीठ विभागात त्याच्या आवश्यकतेप्रमाणे सोयी सुविधा पुरविण्यात / उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

३. दिव्यांग विद्यार्थिनींना परीक्षांबाबत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी विद्यापीठ स्तरावर खालील व्यक्तिला नोडल अधिकारी म्हणून नेमण्यात आलेले आहें.

श्री.अजय भाटीया,
सहाय्यक कुलसचिव, परीक्षा विभाग,
श्रीमती. नाथीबाई दामोदर महिला विद्यापीठ,
जुहू तारा रोड, सांताक्रुझ (प.), मुंबई-४०० ०४९.
E-Mail Id:arexam@sndt.ac.in
Helpline No.:+91 9869663988.

४. तसेच, दिव्यांग विद्यार्थिंना परीक्षांबाबत येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयात एक नोडल अधिकारी नेमण्यात यावा व त्या अधिकाऱ्यांचे नाव, फोन क्रमांक / हेल्पलाईन क्रमांक महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात यावा.

५. तसेच, दिव्यांग विद्यार्थिंनींना परीक्षेसाठी देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांबाबत त्या त्या विद्यापीठ विभागाने / महाविद्यालयाने, संबधित दिव्यांग विद्यार्थिंनींना २१ सप्टेंबर, २०२० पर्यंत अवगत करावे.

कळावे,

आपला विश्वासू,

19/9/2020

(डॉ. सुभाष वाघमारे)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत माहितीस्तव रवाना –
१. मा. कुलसचिव,
२. मा. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
३. मा. कुलगुरुंचे कार्यालय,
४. मा. प्र. कुलगुरुंचे कार्यालय,

सोबत: १. महाराष्ट्र शासन निर्णय, दि.०४ मार्च, २०१७,
२. . मा.संचालक, उच्च व शिक्षण, पत्र, दि.१७ मार्च, २०२०.